मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राष्ट्रिय कृषि विकास योजना, निलंक्रांती, मिशन फिंगरलिंग अंतर्गत प्रजनक साठा केंद्र (Brood Bank) व मत्स्यबीज केंद्राची दुरुस्तीकरिता प्रकल्प - व्यवस्थापक सल्लागार नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. मत्स्यवि-२०१७/प्र.क्र.१६५/पदुम-१३
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १४ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना :

राज्यातील ४.१८ लक्ष हेक्टर गोडया पाण्याचे क्षेत्र उपलब्ध आहे व यामध्ये लहान मोठे पाटबंधारे जलाशय, गाव, तलाव यांचा समावेश आहे. राज्यातील हे उपलब्ध जलक्षेत्र मत्स्यव्यवसायासाठी विकसित करण्यासाठी दरवर्षी अंदाजे ११४ कोटी फिंगरलिंगची आवश्यकता भासते. प्रमुख कार्प, सामान्य कार्प जातीचे मत्स्यबीज निर्माण करण्यासाठी राज्यात ३० हॅचरी व १६ संवर्धन केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. प्रत्येक हॅचरीची क्षमता ७ कोटी मत्स्यजिरे निर्माण करण्याची असून प्रत्येक हॅचरीपासून २.१० कोटी (३०%) मत्स्यबीज निर्माण होऊ शकते. अशा प्रकारे राज्यातील ३० हॅचरीमधून २१० कोटी मत्स्यजिरे व त्यापासून ३०% मत्स्यबीज म्हणजेच ६० कोटी मत्स्यबीज व ३० कोटी मत्स्यबोटुकली निर्माण होऊ शकते. ४६ मत्स्यबीज केंद्राची निर्मिती सन १९६० ते १९९० च्या दरम्यान झाली आहे. केंद्रे दिर्घकाळ वापरात असल्याने तलावात गाळ साचणे, दुष्काळी परिस्थितीमुळे केंद्रास अपुरा पाणीपुरवठा होणे यामुळे ही केंद्रे त्यांच्या उत्पादन क्षमतेएवढे मत्स्यबीज निर्माण करु शकत नाही. पाणीपुरवठा व्यवस्था निरुपयोगी होणे, फिल्टर चेंबरची दुरुस्ती इत्यादि कामे करुन घेणे आवश्यक आहे. सदरील केंद्राची दुरुस्ती व सुधारणा आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध होऊ शकला नाही. मत्स्यबीज केंद्राचे नुतनीकरण करुन निलक्रांती, राष्ट्रीय कृषी विकास योजना, मिशन फ़िंगरलिंग अशा विभागाच्या विविध योजनेअंतर्गत मत्स्यबीज उत्पादनात वाढ करता येईल. सद्यस्थितीत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत काटेपूर्णा जि.अकोला, नागठाणा जि.भंडारा, इटियाडोह जि.गोंदिया व कोराडी जि.बुलढाणा येथे केंद्राची दुरुस्ती/नुतनीकरण करण्यासाठी मान्यता प्राप्त झाली आहे ती कामे तात्काळ सुरु करता येतील.

तसेच मत्स्यबोटुकलीची गरज भागविण्याकरीता राज्याकडे रोहू, कटला, मृगळ जातीचे प्रजनक उपलब्ध नसल्याने राज्याची मत्स्यबोटुकली गरज भागविण्याकरीता चांगल्या प्रतीचे प्रजनक आवश्यक आहेत. राज्यामध्ये निम्नदुधना जि.औरंगाबाद, मखनी जि.उस्मानाबाद, उजनी जि.सोलापूर, चांदोली जि.सांगली, शिवनीबांध जि.भंडारा, मांडवा जि.अमरावती या सहा ठिकाणी प्रजनक साठा केंद्र करण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये विभागातील बहुतांशी काम सल्लागारामार्फत करुन घेतली जात आहेत. त्याच धर्तीवर मत्स्यव्यवसाय विभागाच्या विकासासाठी व मुलभूत पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र / राज्य शासनाच्या योजनेतून मिळणारा निधी खर्च करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची (Project Management Consultant) नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राष्ट्रिय कृषि विकास योजना अंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रजनक साठा केंद्र (Brood Bank) व मत्स्यबीज केंद्राची दुरुस्तीकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणूक करणेबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून जागतिक बँकेने ठरवून दिलेल्या निकषानुसार प्रकल्प सल्लागाराची (Project Management Consultant) निवड करण्यात येवून शासनाच्या मान्यतेने अंतिम करण्यात येईल.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (Project Management Consultant) कामे पुढीलप्रमाणे राहतील.

१) प्रकल्पाची लागणाऱ्या विविध परवानग्या मिळविणे व कामाचे सर्वेक्षण करणे इत्यादि.

२) अंदाजपत्रके तयार करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता करणे व यासाठी विविध सक्षम प्राधिकरणाची मान्यता मिळविणे.

३) कामावर प्रत्यक्ष देखरेख ठेवून कामाचा दर्जा व गुणवत्ता राखणे इत्यादि.

४) केलेल्या कामाचे मोजमाप सादर करुन देयके सादर करणे इत्यादि.

५) अंदाजपत्रकांना (सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावलीनुसार) तांत्रिक मान्यता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंताकडून मिळविणे.

६) प्रकल्प व्यवस्थापकाने निविदा प्रक्रिया राबवून त्यांच्या स्तरावर हॅचरी शेड बांधकाम, तळयाची दुरुस्ती व बांधकाम, केंद्रातील रस्ते बांधकाम, ऑफीस बिल्डिंग व निवासस्थान दुरुस्ती, मत्स्यतळयाची बांधकाम व दुरुस्ती, विद्युतीकरण, पाईपलाईन दुरुस्ती, नर्सरी तळे दुरुस्ती, पाणीसाठा तळी बांधकाम, लेबोरेटरीचे नुतनीकरण करुन घेणे.

७) कामासंबंधित इतर आवश्यक सर्व कामे.

८) समान स्वरुपाची एकापेक्षा अधिक कामे असल्यास, अशी सर्व कामे एकत्रित करुन एकदा निविदा मागविण्याची कार्यवाही करावी.

३. प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार कंपनीने सादर केलेल्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडून करण्यात येईल. तसेच सर्व कामाच्या निविदा या आयुक्त कार्यालयामध्ये आयुक्त मत्स्यव्यवसाय, कार्यकारी अभियंता, मत्स्यव्यवसाय विभाग व सहाय्यक संचालक (वित्त), मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या समितीमार्फत करण्यात याव्या. तसेच सर्व सादर केलेल्या सर्व देयकांना मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना असतील.

४. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सदर प्रक्रियेचे सनियंत्रण अधिकारी राहतील. प्रक्रिया विहित कालावधीत पुर्ण करण्याची व त्यासाठी ज्या योजनेतंर्गत निधीचा विनियोग केलेला आहे त्याची जबाबदारी ही आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११४१२१६१९४४०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.11.14 12:20:30 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र राज्य, विधानसभा/विधानपरिषद
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६. सचिव (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक
७. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
८. मुख्य अभियंता, (विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
९. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/ अमरावती.
१०. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, (सर्व जिल्हे)
११. निवडनस्ती, पदुम-१३.